
सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ४ जुलै २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# ‘२१ व्या शतकातील सर्वात मोठ्या ऊर्जा संकटावर भारतानं मिळवला विजय!’ ; पंतप्रधान मोदींचं प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४जोधपूर–** पश्चिम आशियातील युद्धामुळे संपूर्ण जग मंदीच्या विळख्यात सापडले असताना, भारताने २१ व्या शतकातील सर्वात मोठ्या ऊर्जा संकटाचा यशस्वीपणे सामना केला आहे, असा ठाम विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. योग्य वेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय, अचूक नियोजन आणि भारताच्या मजबूत मुत्सद्देगिरीमुळे देश इंधनाच्या मोठ्या धक्क्यातून सुरक्षित राहिला, असं प्रतिपादन त्यांनी केलं.राजस्थानमधील बहुप्रतीक्षित रिफायनरी प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी बोलत होते. यावेळी त्यांनी जोधपूर विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचंही लोकार्पण केलं.जागतिक परिस्थितीवर भाष्य करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, पश्चिम आशियातील संघर्षामुळे जगातील अनेक मोठ्या अर्थव्यवस्था अभूतपूर्व ऊर्जा



संकटाचा सामना करत आहेत. मात्र, २१ व्या शतकातील नव्या भारताच्या इच्छाशक्तीनं आणि प्रयत्नांनी या महासंकटावर मात केली आहे.भारतानं प्रत्येक पातळीवर वेळेतच योग्य निर्णय घेतले, संकटाचा आधीच अंदाज घेऊन प्रभावी रणनीती आखली आणि आपल्या राष्ट्रीय संसाधनांचा संतुलितपणे वापर केला, ज्यामुळे देशांतर्गत पुरवठ्यावर कोणताही परिणाम झाला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

याच दरम्यान विरोधकांवर निशाणा साधताना पंतप्रधान म्हणाले, संकटाच्या काळात काही शक्ती देशात भीतीचे वातावरण आणि अफवा पसरवण्यात व्यस्त होत्या. मात्र, आमचे सरकार सर्वसामान्यांना अखंड ऊर्जा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पडद्यामागे अहोरात्र काम करत होते.

भारताच्या एलपीजी (ङ्झञ्) गरजेपैकी जवळपास ६० टक्के भाग आयातीवर अवलंबून आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे ‘हॉर्मुजची सामुद्रधुनी’ बंद होण्याचा धोका निर्माण झाला होता, ज्यामुळे भारतात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण होऊ शकला असता.

युद्धाच्या काळात भारतीय मुत्सद्देगिरीने आपली खरी ताकद दाखवून दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेल्या मजबूत संबंधांमुळेच आपण अशा कठीण परिस्थितीतही जगातील तब्बल ४० देशांमधून इंधनाचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्यात यशस्वी झालो असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणालेत.

आपल्या खास शैलीत विरोधकांना उत्तर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, तुम्ही मला ओळखता, ज्या प्रकल्पाचे भूमिपूजन मी करतो, त्याचे उद्घाटनही मीच करतो! त्यांच्या या विधानाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दल नकारात्मकता पसरवणाऱ्यांवर टीका करताना ते म्हणाले की, जे लोक जागतिक संकटाच्या काळात भारताच्या अपयशाची भविष्यवाणी करत होते, ते आज निराशेच्या गर्तेत बुडाले आहेत. भारताने आपल्या निर्णायक नेतृत्वाने आणि धोरणांनी जगाला आपली ताकद दाखवून दिली आहे.

# स्मार्ट मीटर बसवणे कायद्यानेच बंधनकारक
## सरकारचं विधानसभेत स्पष्टीकरण,गैरसमज पसरवू नका...

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.४मुंबई –** विद्युत अधिनियम २००३ आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण मीटर विनियम २००६ नुसार सर्व वीज कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविणे बंधनकारक आहे. त्यानुसार राज्यात १ कोटी २३ लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. त्यापैकी केवळ ३ लाख ९२ हजार ग्राहकांच्या तक्रारी आल्या आहेत. त्या तक्रारींचेही निवारण केले जात आहे. याबाबत आमदारांनी विनाकारण गैरसमज पसरवू नयेत, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी



सांगितले.

विधानसभेत पुण्यातील खंडित होणारा वीजपुरवठा आणि स्मार्ट मीटरसंदर्भात आमदार भीमराव तापकीर यांनी लक्षवेधी मांडली होती. या लक्षवेधीवर बोलताना आमदार चेतन तुपे, नीलेश राणे, नाना पटोले यांनी स्मार्ट मीटरमुळे वीज बिल जास्त येत असल्याचा मुद्दा मांडला.

स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात तिपटीने वाढ झाली आहे. कंपनीने बनविलेले मीटर बरोबर आहेत का, हे तपासण्याची यंत्रणा आहे का तसेच कोणते मीटर लावायचे याचा निर्णय घेण्याचा अधिकार ग्राहकांना असेल का, असे प्रश्न चेतन तुपे यांनी विचारले.यावर बोर्डीकर म्हणाल्या, पुण्यात जून २०२६ पर्यंत ९ लाख ७४ हजार स्मार्ट मीटर बसवले. त्यापैकी ११ हजार ७७० तक्रारी ग्राहकांनी जादा वीज बिलाची तक्रार केली होती. तपासणीनंतर या तक्रारींपैकी केवळ ४ तक्रारींत तथ्य आढळून आले आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढते हे चुकीचे असल्याचे बोर्डीकर म्हणाल्या.

### अधिकारी मार खातील मीटर बसवणे थांबवा

ग्रामीण भागात प्रत्येक जिल्ह्यात स्मार्ट मीटरचा संघर्ष सुरू आहे. या प्रकरणी अधिकारी कधीतरी मार खातील अशी स्थिती असून हे होऊ नये म्हणून स्मार्ट मीटर बसविणे थांबवावे, अशी मागणी नीलेश राणे यांनी केली. तसेच तक्रारी कमी असल्याची माहिती खोटी आहे, खालचे अधिकारी खरी माहिती सरकारला देत नसल्याचेही राणे म्हणाले. तर स्मार्ट मीटरचे काम एका मोठ्या कंपनीला दिले आहे. कोणाच्या दबावाखाली हे सुरू आहे? या मीटरमुळे चारपट बिल येत असून, लोकांचे आर्थिक गणित बिघडले असल्याचे नाना पटोले म्हणाले.

# जिल्हा सामान्य रुग्णालयातील वार्डमध्ये सिलिंगचा भाग कोसळला
## सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती–** अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील एका वार्डमध्ये शनिवारी सिलिंगचा काही भाग अचानक कोसळल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने घटनेच्या वेळी त्या ठिकाणी कोणताही रुग्ण किंवा कर्मचारी नसल्याने जीवितहानी टळली. मात्र या घटनेमुळे जिल्हा सामान्य रुग्णालयातील रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रुग्णालयाच्या विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी शिरल्याच्या घटना समोर आल्या होत्या. त्यावेळी अनेक लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी रुग्णालयाची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती व उपाययोजनांचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात ठोस कामे न झाल्याने आज सिलिंग कोसळण्याची घटना घडल्याचे बोलले जात आहे.रुग्णालयात उपचारासाठी



येणाऱ्या हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीची तातडीने तांत्रिक तपासणी करून धोकादायक भागांची दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे. विशेषतः पावसाळ्यात अशा घटना वारंवार घडत असल्याने प्रशासनाने केवळ पाहणी न करता कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील दुर्लक्ष पुन्हा एकदा समोर आले आहे.–

# उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाच्या दिशेने पाऊल टाकलं तर स्वागतच
## बच्चू कडूंची भूमिका, म्हणाले- हा भाजप आणि शिवसेनेचाच मूळ विचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मुंबई**
शिवसेना (शिंदे गट) नेते बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करत त्यांना काही दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. त्याचवेळी उद्धव ठाकरे यांनी रामरक्षा पठण आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावर सुरू केलेल्या आंदोलनाचे स्वागत करत, उद्धव ठाकरे हिंदुत्वाच्या दिशेने एक पाऊल टाकत असतील तर त्याचे स्वागतच आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच शेतकरी कर्जमुक्तीच्या निर्णयात आवश्यक दुरुस्त्या करूनच अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षाही त्यांनी सरकारकडे व्यक्त केली.

**’उद्धव ठाकरे हिंदुत्वाच्या दिशेने येत असतील तर स्वागत’**

उद्धव ठाकरे यांनी रामरक्षा पठण आणि हिंदुत्वाशी संबंधित आंदोलनाची घोषणा केल्याबाबत विचारले असता बच्चू कडू यांनी मवाळ भूमिका घेतली. ते म्हणाले की, भाजप आणि शिवसेनेचा जो मूळ विचार आहे, त्या विचारांच्या दिशेने



उद्धव ठाकरे एक पाऊल टाकत असतील तर त्याचे स्वागत केले पाहिजे. त्यांनी अशाच प्रकारे पुढेही पावले टाकावीत. त्यामुळे हिंदुत्वाशी संबंधित अनेक प्रश्नांवर अधिक सकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### उपमुख्यमंत्री शिंदेंनी आता स्वतःच्या प्रकृतीलाही वेळ द्यावा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबत बोलताना बच्चू कडू म्हणाले की, शिंदे हे कार्यकर्त्यांसाठी नेहमी उपलब्ध असतात. पहाटेपर्यंत कार्यकर्त्यांच्या भेटी, लोकांच्या समस्या आणि बैठका अशा सततच्या धावपळीमुळे त्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांच्या मते, शिंदे यांना ताप असतानाही त्यांनी बैठकींना उपस्थिती लावली होती. चोवीस तास काम करणाऱ्या व्यक्तीने आता काही काळ स्वतःसाठीही वेळ काढला पाहिजे. शरीराला विश्रांती मिळाली नाही तर अडचणी वाढू शकतात. त्यामुळे त्यांनी लवकर बरे होऊन पुन्हा जनसेवेत सक्रिय व्हावे, अशी प्रार्थना असल्याचे कडू यांनी सांगितले.

# मुसळधार पाऊस आहे, शासनाचे अलर्ट पाहूनच शक्यतो घराबाहेर पडावे; मुख्यमंत्री

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मुंबई –** राज्यात विशेषत: ठाणे, रायगड, पालघर, पुणे, नाशिक आणि इतर भागांमध्ये अतिशय मुसळधार पाऊस आहे. कालपासून आपण वेगवेगळे अलर्ट दिलेले आहेत. या भागात ६ तारखेपर्यंत सातत्याने अतिशय मुसळधार पाऊस असेल, वादळे येतील, सरासरीपेक्षा कितीतरी अधिक मोठा पाऊस होईल. प्रवास टाळता आला, तर तो टाळायला हवा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ते पत्रकारांशी बोलत होते. मुंबईसह उपनगरात गेल्या चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. पावसाचा फटका रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला बसला आहे. हवामान विभागाने मुंबई



महानगराला अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला आहे. गेल्या २४ तासांत मुसळधार पाऊस झाल्याने अनेक ठिकाणी १०० मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली. महाराष्ट्रात ४ ते ७ जुलै दरम्यान जोरदार पावसाची शक्यता असून, ठाणे, पुणे घाटमाथा, पालघर, सातारा, रायगड या जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. विविध ठिकाणी २०० ते २५० मिमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला सतर्क राहण्याचे तसेच घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.



## संपादकीय ......

# बालभारतीचा सांस्कृतिक गोंधळ

*शालेय पाठ्यपुस्तके ही केवळ अक्षरांची ओळख करून देणारी माध्यमं नसतात, तर ती विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या संस्कृतीची, इतिहासाची आणि परंपरांची पाळेमुळे रुजवणारी महत्त्वाची साधनं असतात. नुकताच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) इयत्ता ६ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. लोकनृत्य या शीर्षकाच्या असलेल्या धड्यात महाराष्ट्रातील अत्यंत समृद्ध आणि जगप्रसिद्ध लोकपरंपरांना डावलून इतर राज्यांतील लोकनृत्यांना झुकते माप दिल्याचा आरोप होत आहे. ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक नामवंत अभ्यासक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांनी बालभारतीच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप नोंदवला असून हा वाद आता चांगलाच पेटला आहे. राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना संस्कृती, परंपरा शिकवण्यासाठी पाठ्यपुस्तकात जो धडा समाविष्ट केला जाईल, तेव्हा त्यात महाराष्ट्राच्या मातीतील कलाप्रकारांना प्राधान्य मिळेल अशी साहजिकच अपेक्षा असते. मात्र, बालभारतीच्या पुस्तकात अगदी या विपरीत घडले आहे. लोकनृत्य शीर्षकाच्या या धड्यात एकूण ५ लोकनृत्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील केवळ वारकरी दिंडी हे एकमेव लोकनृत्य घेण्यात आले आहे. तर उर्वरित ४ लोकनृत्ये ही भारताच्या इतर वेगवेगळ्या राज्यांतील आहेत. यामध्ये पंजाबचा भांगडा, गुजरातचा गरबा, बिहारमधील आदिवासी नृत्य आणि छत्तीसगडच्या बस्तर भागातील लोकनृत्याचा समावेश करण्यात आला आहे. खरे तर या धड्यातून महाराष्ट्रातील मराठी मनाला आणि संस्कृतीला साद घालणारी लावणी, लेझीम, कोळी नृत्य, जागरण-गोंधळ, पोवाडा, धनगर समाजाचे ढोलाच्या तालावरील पारंपरिक नृत्य यांसारख्या कलाप्रकारांची ओळख करून द्यायला हवी होती. परंतु त्याऐवजी परराज्यातील नृत्यांना सहावीत शिकणार्या विद्यार्थ्यांच्या बालमनावर बिंबवण्याचा प्रयत्न होत आहे. यावर अभ्यासकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.*

*महाराष्ट्र ही संतांची, वीरांची आणि अत्यंत वैभवशाली सांस्कृतिक वारसा लाभलेली भूमी आहे. प्रत्येक मैलानुसार बदलणार्या भौगोलिक स्थानाला स्वत:ची अशी एक वेगळी परंपरा आहे. या परंपरेत लोककला आणि लोकनृत्यांना महत्त्वाचे स्थान आहे. असे असूनही या धड्यात महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेला डावलण्यात आले आहे. जर सहावीच्या विद्यार्थ्यांना लोकनृत्यांची ओळख करून द्यायचीच होती, तर आधी आपल्या राज्यातील वैविध्यपूर्ण लोककलांची ओळख सविस्तरपणे करून देणे गरजेचे होते. तसे न करता आपल्या घरची श्रीमंती बाजूला ठेवून शेजार्यांच्या वैभवाचे गुणगान गाण्याचा हा प्रकार आहे. महाराष्ट्रातील मुलांना आधी स्वत:च्या राज्याची संस्कृती, मातीचा गंध आणि या मातीतून जन्माला आलेल्या लोककला समजायला हव्यात. परराज्यातील संस्कृतीचा आदर नक्कीच असावा, पण तो स्वत:च्या संस्कृतीला डावलून किंवा तिची उपेक्षा करून नसावा. सर्वात खेदाची बाब म्हणजे, या धड्यावरून एवढा मोठा वाद निर्माण झालेला असतानाही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती यांनी अद्याप यावर कोणताही अधिकृत खुलासा केलेला नाही. या मौनामुळे शिक्षण वर्तुळात संताप आणखी वाढला असून, निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. बालभारतीचा अभ्यासक्रम तयार करताना देशातील विविधतेची ओळख करून देणे आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासणे हा हेतू असू शकतो. पंजाब, गुजरात, बिहार आणि छत्तीसगडच्या लोकनृत्यांचा समावेश करण्यामागे भारतीय संस्कृतीची बहुविधता विद्यार्थ्यांना कळावी हा यामागे विचार असू शकतो. परंतु, राष्ट्रीय एकात्मतेचा पाठ देताना प्रादेशिक अस्मिता आणि स्थानिक वारसा दुय्यम ठरवला जाऊ शकत नाही. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर मुलांना आधी स्वत:च्या परिघातील संस्कृतीशी जोडणे हे मानसशास्त्रीयदृष्ट्या अधिक योग्य असते. महाराष्ट्रात राहणार्या विद्यार्थ्याला लेझीम, पोवाडे किंवा गोंधळ यामागचा इतिहास, या लोककलांच्या सादरीकरणाची पद्धत माहीत नसताना, त्याने थेट छत्तीसगडच्या बस्तर नृत्याचा अभ्यास करावा, हा अभ्यासक्रम तयार करणार्या तज्ज्ञांचा वैचारिक गोंधळ नाही तर दुसरे काय? हा वाद आता केवळ साहित्यिक वर्तुळापुरता मर्यादित राहिलेला नसून, सामाजिक माध्यमे आणि राजकीय स्तरावरही या धड्यावर चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणावर आणि शिक्षण पद्धतीवर नेहमीच जागरूक असणार्या या राज्यात, थेट बालभारतीच्या पुस्तकावर आक्षेप घेतल्याने शासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.*

*बालभारतीची पुस्तके अत्यंत जबाबदारीने आणि तज्ज्ञांच्या समितीकडून तयार केली जातात. अशा वेळी महाराष्ट्रातील एवढ्या मोठ्या लोकपरंपरेची उपेक्षा होणे ही नक्कीच या तज्ज्ञांना विचार करायला लावणारी गोष्ट आहे. विविधतेत एकता साजरी करताना आपल्या स्वत:च्या समृद्ध मुळांना विसरून चालणार नाही. या वादाच्या निमित्ताने पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रियेतील त्रुटींवर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे. आता शासन यावर काय पाऊल उचलते आणि बालभारती आपली चूक सुधारून महाराष्ट्राच्या लावणी, लेझीम, पोवाड्याला पुस्तकात त्यांचे हक्काचे मानाचे स्थान परत देते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. आधीच इंग्रजी माध्यमात शिकणारी पिढी प्रचंड सांस्कृतिक, भाषिक घुसळणीतून जात आहे. अशा स्थितीत महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांना इथल्या मातीतल्या लोककला, परंपरांचे धडे कसे काय मिळतील याला प्राधान्य देणे खूपच गरजेचे आहे. त्यासाठी आधी बालभारतीच्या तज्ज्ञांनी स्वत:च्या मनातला सांस्कृतिक गोंधळ दूर करायला हवा.*

# अचलपूरच्या बेरोजगारीचा मुद्दा विधानसभेत

## आ. प्रवीण तायडे यांची उद्योग, रोजगार आणि महिला सक्षमीकरणासाठी ठोस मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती –** अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी विधानसभेत अचलपूर परिसरातील वाढती बेरोजगारी, उद्योगधंद्यांची पडझड आणि महिला बचत गटांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित केला. रोजगारनिर्मितीसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली.

सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या शोधात मुंबई आणि नागपूरसारख्या शहरांकडे स्थलांतर करावे लागत आहे. एकेकाळी हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह चालवणारी फिनले मिल बंद पडल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.



गेल्या तीन महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतनही थकले असूनमुलांच्या शिक्षणाचा आणि दैनंदिन गरजांचा खर्च भागवणेही त्यांच्यासाठी कठीण झाले आहे. त्यामुळे बिनले मिल तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यासोबतच अचलपूर एमआयडीसीचे पुनरुज्जीवन करून नवीन उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, विशेष संत्रा प्रक्रिया प्रकल्प, दुग्ध प्रक्रिया प्रकल्प तसेच स्वयंपूर्ण उद्योगांसाठीविशेष औद्योगिक क्लस्टर मंजूर करावे, अशीही मागणी त्यांनी सरकारकडे केली. महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी अचलपूर आणि चांदूर बाजार येथे त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी कायमस्वरूपी स्टॉल किंवा 'महिला मॉल' उभारण्यात यावा. यामुळे महिलांना स्वावलंबी होण्यास मदत होईल आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल, असेही आमदार तायडे यांनी विधानसभेत नमूद केले. शिक्षित तरुणांमधील वाढती बेरोजगारी, बंद पडलेले उद्योग आणि महिला बचत गटांच्या प्रलंबित मागण्यांकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी आमदार प्रवीण तायडे यांनी विधानसभेत केली.

# त्रैमासिक विवरणपत्र ऑनलाइन सादर करावेत

## जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अमरावती–** खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांनी त्रैमासिक विवरणपत्र ई-आर-१ ऑनलाइन पद्धतीने सादर करावेत, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाने केले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामार्फत देण्यात येणाऱ्या योजना विषयक सर्व सेवा आता ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासाठी ारहीुरूा.सीें.ळप हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. तसेच उद्योग आणि आस्थापना यांनी सेवायोजन कार्यालय (रिक्त पदे अधिसूचित करण्याची सक्ती करणे) कायद्यान्वये त्रैमासिक ई-आर-१ ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. जून २०२६ अखेर संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीकरिता ई-आर-१ ची प्रणाली माहिती वरील संकेतस्थळावर सर्व शासकीय, निमशासकीय, खासगी उद्योजक, आस्थापना यांनी त्यांचे युजर आयडी व पासवर्डच्या माध्यमातून लॉगिन करून ऑनलाइन सादर करावयाचे आहे. तसेच, त्याबाबतचे प्रमाणपत्र संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावयाचे आहे. ऑनलाइन ई-आर १ सादर करताना अडचणी आल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती या कार्यालयाशी संपर्क साधावा. यासाठी कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ उपलब्ध आहे. ई-आर १ सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. या मुदतीत ई-आर १ ऑनलाइन सादर करू शकले नसल्यास संबंधित आस्थापनांवर विहित नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी कळविले आहे.-

### केंद्राकडून मंजूर 'पीएम ई बस' सेवा सुरू होईस्तोवर

# सिटी बसच्या कंत्राटाला मुदतवाढ

## प्रस्तावाला 'स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

विधान परीषद निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर शुक्र वारला स्थायी समितीची बैठक झाली. या बैठकीत प्रामुख्याने सिटी बसचा मुद्दा उपस्थित झाला. केंद्र शासनाने मंजूर केलेली 'पीएम ई 'बस' सेवा सुरु झालेली नाही. त्यामुळे सध्याची शहर बससेवाच पुढे चालविण्यात आवश्यक आहे. या अनुषंगाने कंत्राटाला मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मनपा प्रशासनाने स्थायी समितीपुढे ठेवला होता. त्या प्रस्तावाला शुक्रवारला स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी दिली. सभापती अविनाश मार्डीकर यांच्या

अध्यक्षतेत ही बैठक पार पडली. एकीकडे सध्याच्या शहर बससेवेच्या कंत्राटाची मुदत गत २४ मे रोजीच संपली, तर दुसरीकडे ई-बस सुरू होण्यासाठी अद्याप तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे सध्या शहर बस वाहतूक सेवा सुरू ठेवणे आवश्यक आहे, असे



प्रशासनाचे मत आहे; मात्र डिझेलचे वाढलेले दर, बसेसचा देखभाल खर्च व इतरही खर्च लक्षात घेता दर महिन्याला सहा ते सात लाख रूपयांनी नुकसान होत असल्याचा दावा कंत्राटदाराने केला आहे. त्यामुळे ही बससेवा सुरू ठेवणे शक्य नसल्याने बँक गॅरंटीही कंत्राटदाराने परत मागितली आहे. त्यामुळे महापालिकेला मिळणाऱ्या रॉयल्टीमध्ये सूट देणे किवा अन्य पद्धतीनेकाही प्रमाणात आर्थिक भार उचलण्यांची तयारी महापालिकेने दर्शविली आहे.

# अप्पर वर्धा धरणामधील जलाशयाच्या पातळीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मोर्शी –** पावसाळा सुरू होऊन जवळपास एक महिना झाला असला तरी गेल्या आठवड्यापासून अप्पर वर्धा धरणाच्या



पर्जन्यक्षेत्रात तसेच मध्य प्रदेशातील वर्धा नदीच्या उगम स्थानावर झालेल्या जोरदार पावसामुळे परिसरातील नदी नाले जोरदार वाहू लागले आहे. त्याचप्रमाणे अप्पर वर्धा धरणात येणाऱ्या जाम व वर्धा नदीला मोठा पूर आल्याने अप्पर वर्धा धरणाचा जलस्तर वाढला आहे. दि. १ जून रोजी अप्पर वर्धा धरणाचा ४५.७१ टक्के एवढा जलसाठा होता. सतत धार होत असलेल्या पावसामुळे नदी नाल्याला आलेल्या पुरामुळे दिनांक ३ जुलै रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अप्पर वर्धा जलाशयात ४९.६२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

# निकृष्ट कामामुळे रस्त्याची दुरवस्था

## निवासी वस्त्यांना जोडणारा रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४वरुड –** वरुड शहरातील प्रमुख निवासी वस्त्यांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पूर्णतः खराब झाला आहे. पावसाळ्यात ठिकठिकाणी खड्डे आणि साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काही वर्षांपूर्वी या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र, कामाच्या गुणवत्तेबाबत



सुरवातीपासूनच प्रश्न उपस्थित होत होते. सध्या रस्त्यावरील डांबरी थर उखडला असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत असल्याने वाहन चालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याचा धोका वाढला असून पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. या मार्गाचा दररोज शेकडो नागरिक, वकील, न्यायालयीन कर्मचारी, अधिकारी आणि विद्यार्थी वापर करतात. शहरातील अनेक निवासी भागांनाही हा रस्ता जोडत असल्याने वाहतुकीची मोठी वर्दळ असते. तरीही संबंधित यंत्रणेकडून कायम स्वरूपी दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. स्थानिक नागरिकांनी रस्त्याची तातडीने उच्च दर्जाने पुनर्बांधणी करण्याची मागणी केली आहे. तसेच निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि भविष्यात दर्जेदार व सुरक्षित रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# वरुडच्या दोन युवकांनी सर केले हम्पटा पास

## आराध्य कोरडे व आर्यन बेलसरे यांची कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४वरुड–** वरुड शहरातील साहसी युवा आराध्य कोरडे आणि आर्यन बेलसरे यांनी समुद्रसपाटीपासून १४, १०० फूट उंचीवरील हिमाचलचा प्रसिद्ध हम्पटा पास ट्रेक यशस्वीरीत्या पूर्ण करून वरुडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कुल्लू आणि लाहौल खोऱ्यांना जोडणारा सुमारे २८ किलोमीटरचा हा ट्रेक पाच दिवसांत पूर्ण करण्यात आला. मनाली येथून सुरू झालेल्या या साहसी मोहिमेत जॉब्रा, चिका, बलू का घेरा, हम्पटा पास, शिया गोरू आणि छत्रू, असा खडतर प्रवास करीत दोघांनी हिमालयाच्या कुशीत अविस्मरणीय अनुभव घेतला. ट्रेकदरम्यान कमी ऑक्सिजन, गोठवणारी थंडी, सतत बदलणारे हवामान, बर्फाच्छादित चढाई, हिमनदीवरील प्रवाह आणि कठीण पर्वतीय मार्ग, अशा अनेक आव्हानांचा त्यांनी धैर्याने सामना




केला. १४, १०० फूट उंचीवरील हम्पटा पास सर केल्यानंतर कुल्लू खोऱ्यातील हिरवाईतून लाहौलच्या रुक्ष आणि बर्फाच्छादित प्रदेशात होणारा निसर्गाचा अद्भुत बदल अनुभवण्याची संधी त्यांना मिळाली. या मोहिमेदरम्यान त्यांनी हिमालयातील प्रसिद्ध चंद्रताल सरोवरालाही भेट दिली. निळेशार पाणी, बर्फाच्छादित पर्वतरांगा आणि निसर्गाचे अप्रतिम सौंदर्य यामुळे हा प्रवास त्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव ठरला. आराध्य कोरडे आणि आर्यन बेलसरे यांच्या या यशस्वी साहसी मोहिमेमुळे वरुड शहराच्या नावात आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. त्यांच्या या कामगिरीबद्दल मित्रपरिवार, नागरिक तसेच विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. तसेच त्यांच्या या यशामुळे इतर युवकांनाही गिर्यारोहण, साहसी पर्यटन आणि निसर्गसंवर्धनाची प्रेरणा मिळत आहे.

# 'कॉकरोच जनता पार्टी'ची चांदूर रेल्वेत एंट्री

## विद्यार्थी प्रश्नांसाठी युवकांचा एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४चांदूर रेल्वे :** देशभरात चर्चेत असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी)' या नावाने चांदूर रेल्वे येथे युवकांचे स्वतंत्र व्यासपीठ उभे राहत असून विद्यार्थी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलनाची तयारी सुरू करण्यात आली आहे. १ जुलै रोजी झालेल्या बैठकीत आगामी आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली.बैठकीत एसएससी (जीडी), नीट, टीईटीसह विविध भरती परीक्षांतील पेपरफुटी रोखणे, परीक्षा प्रक्रिया पारदर्शक करणे, एमपीएससी परीक्षा ऑनलाइन न घेणे, परीक्षा शुल्क कमी करणे




आणि सरकारी शाळा बंद न करण्याच्या मागण्या करण्यात आल्या. तसेच सर्व स्पर्धा व भरती परीक्षा निश्चित वार्षिक कॅलेंडरनुसार वेळेवर घेऊन त्यांचे निकालही निश्चित कालावधीत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली.सीजेपी हा कोणताही राजकीय पक्ष नसून विद्यार्थी, युवक आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी उभे राहणारे स्वतंत्र व्यासपीठ असल्याचे युवकांनी स्पष्ट केले. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होत असल्याची खंत व्यक्त करत, विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला. याशिवाय शेतकरी प्रश्न, महागाई आणि स्मार्ट मीटरसारख्या सर्वसामान्यांच्या मुद्द्यांवरही भविष्यात एकत्रित लढा उभारण्याचा संकल्प करण्यात आला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भाचे नंदनवन बहरले ..... चला चिखलदरा

## पर्यटकांना खुणावतोय मेळघाट : दमदार पावसामुळे वातावरणात गारवा

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ४चिखलदरा**

रिमझिम पाऊस, वातावरणातील गारवा, दऱ्या-खोऱ्यांमध्ये दाटलेले धुके, हिरवाईने पांघरलेले शालू अन् आल्हाददायक वातावरणाचा आनंद घेण्यासाठी चिखलरा पर्यटनगरी आता सज्ज झाली आहे. शनिवारी तसेच रविवारी या ठिकाणी चांगलीच गर्दी होण्याचे संकेत आहेत. मागील आठवड्यापासून मेळघाटच्या दऱ्या-खोऱ्यात पावसाने चांगलीच हजेरी लावली आहे. त्यामुळे येथील वातावरण अतिशय अल्हाददायक व मनमोहक झाले आहे. सकाळच्या वेळी धुके दाटून येत असून पावसाच्या सरी कोसळत असल्यामुळे वातावरणात चांगलाच गारवा आला आहे. त्यामुळे हे वातावरण पर्यटकांना भुरळ घालत आहे. चिखलदऱ्यात प्रमुख्याने आठ ते दहा पॉईंट असून त्यामध्ये प्रामुख्याने भिमकुंड, देवी पॉइंट, ऐतिहासिक गाविलगड किल्ला, मालवीय पॉईंट, शिवसागर पॉइंट, हरिकेन पॉइंट, गोराघाट पॉइंट, पंचबोल पॉइंट यांचा समावेश आहे. प्रत्येक पॉइंटवर पर्यटकांची रेलचेल राहणार आहे. सगळीकडे हिरवळ सध्या चिखलदरात व आजूबाजूच्या मेळघाटचे जंगल हिरवळीने आच्छादले असून नदी नाले सुद्धा वाहू लागल्याने नसर्गाचा आनंद घेण्याची ही उत्तम संधी आहे. या सोबतच डोंगरावर धुके दाटल्याने पर्यटकांना वेगळीच अनुभूती येत आहे.



**अर्थचक्राला येणार वेग**

चिखलदरा व आजूबाजूच्या खेड्यातील नागरिकांचे अर्थकारण हे पर्यटनावर अवलंबून असून या ठिकाणच्या नागरिकांचे जीवनमान पर्यटनामुळे उंचावले आहे. पावसाळ्यात पर्यटकांची संख्या वाढणार असल्याने व्यवसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. व्यवसायिकांनी आपली तयारी केली असून पर्यटकांच्या स्वागतासाठी सारेच सज्ज झाले आहेत.

### बॉडीवॉर्न कॅमेऱ्यांसह २०० पोलिस तैनात तळीरामांवर राहणार विशेष नजर

जिल्ह्यातील महत्वाचे पर्यटनस्थळ असलेल्या चिखलदरात पावसाळ्यात पर्यटकांच्या होणाऱ्या गर्दीवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी सुटीच्या दिवसांसह पुढील तीन महिने २०० पोलिस बॉडीवॉर्न कॅमेऱ्यासह तैनात राहणार आहेत. चिखलदरा विदर्भातील प्रमुख पर्यटनस्थळ असून, पावसाळ्यात येथे मोठ्या प्रमाणात गर्दी होते. पर्यटकांचा प्रवास सुरक्षित, आनंददायी व्हावा, वाहतूक विस्कळित होऊ नये, अपघाताचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी ग्रामिण पोलिसांसाठी व्यापक नियोजन करून बंदोबस्त तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षीच्या पावसाळी पर्यटन हंगामात २०० पोलिस अधिकारी व अंमलदार मदतीला १०० होमगार्ड विविध महत्वाच्या पॉइंटवर तैनात राहणार आहेत. पर्यटनस्थळे, पॉइंट, मुख्य रस्ते, गर्दीच्या ठिकाणावर अशी तैनाती दिसेल. पार्किंग व्यवस्था व वाहतूक नियमावर विशेष लक्ष राहील. पर्यटकांना तत्काळ मदत व्हावी, मार्गदर्शन व जनजागृती करण्यासाठी १४ पोलिस मोटरसायकल रायडर्सना बॉडी वॉर्न कॅमेरा तसेच सार्वजनिक सूचना प्रणाली देण्यात आली आहे. १४ ही पोलिस रायडर्स सतत गस्त घालून वाहतूक नियंत्रणासह अपघातकालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवणार आहेत. काही उत्साही पर्यटकांकडून मद्यप्राशन करून बेधुंद वाहने चालविल्या जातात. त्यांच्यावर कारवाईसाठी तपासणी नाके उभारण्यात आले असून, वाहनचालकांची नियमीत तपासणी करण्यात येणार आहे. मद्यपी वाहनचालकांवर ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह अंतर्गत कारवाही केल्या जाईल. त्यामुळे वाहनाच्या वेगावर नियंत्रण, हेल्मेट व सिटबेल्टचा वापर, ट्रिपल सीट दुचाकी चालवू नये याकडे लक्ष दिल्या जाणार आहे. गर्दीच्या ठिकाणी चोरी, पाकीटमारीसह, महिला व युवतीसोबत असभ्य वर्तन केल्या जाते. त्यावर अंकुश ठेवण्यासाठी विशेष पथकासह महिलांचे दामिनी पथकही तैनात राहणार आहे.

# अल्पवयीन मुलीचे फोटो सोशल मीडियावरून व्हायरल


**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मोर्शी-** इयत्ता दहावीत शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीचे फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावरुन व्हायरल करून तिची बदनामी करण्यात आल्याची धक्कादायक घटना जिल्ह्यात घडली. तर, दुसऱ्या घटनेत एका अल्पवयीन मुलीच्या घरात शिरून बळजबरीचा प्रयत्न करण्यात आला. जिल्ह्यातील वरुड आणि मोर्शी ठाण्याच्या हद्दीत या घटना घडल्या आहे. अल्पवयीन शालेय मुलीचा संशयित विधीसंघर्षीत बालक ऑनलाइन पद्धतीने एकतर्फी प्रेमप्रकरणातुन पाठलाग करीत होता. शिवाय संशयित विधीसंघर्षीताने पिडीत मुलीचा प्रत्यक्षातही ती शाळेत जाताना पाठलाग केला आहे. तिच्यासोबत इच्छेविरुद्ध प्रेमसंबंध ठेवण्याचा संशयिताचा प्रयत्न होता. मुलीने प्रतिसाद न दिल्यामुळे तिची बदनामी करण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावरुन तिचे फोटो आणि व्हीडीओ व्हायरल करण्यात आले. ही बाब पिडीतेच्या पालकांच्या निदर्शनात येताच त्यांनी वरुड ठाण्यात तक्रार दिली असता, पोलिसांनी संशयित विधीसंघर्षीत बालकांविरुद्ध विनयभंगासह बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधित कायदा (पोक्सो) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मोर्शी ठाण्याच्या हद्दीत अन्य दुसऱ्या घटनेमध्ये पिडीत अल्पवयीन मुलगी घरात एकटी जेवण करीत असताना, संशयित शुभम चंद्रभान ईवनाते (वय ३०) याने गाय लोखंडी अँगलला बांधून पिडीतेच्या घरात शिरला. तिच्याशी संशयिताने बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. पिडीतेने आरडाओरड करताच, संशयित शुभम ईवनाते पळून गेला. पिडीतेने घटनाक्रम नातेवाइकास सांगून याप्रकरणी मोर्शी पोलिसांत तक्रार केली असता, पोलिसांनी संशयित शुभम ईवनाते विरुद्ध विनयभंग व पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला. असे मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनी सांगितले.

# सकाळी शाळेचे वर्ग, दुपारी सर्वेक्षण

## आजपासून शाळा सकाळच्या सत्रात : एसआयआरची कामे पूर्ण करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

शाळा सुरु झाल्या असून अमरावती मधील सर्व शाळा आज शनिवारपासून सकाळच्या सत्रात घेण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे दुपारच्या वेळी निवडणुक आयोगकडून देण्यात आलेला मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आल्याने गुरुजींना आता अग्निपरीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा




कार्यक्रम घोषित केला असून ३० जून ते २९ जुलै या कालावधीत सर्व मतदार केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी घरोघरी जावून दोन प्रतिंमध्ये गणनापत्र भरून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी पुरेसा अवधी लागणार आहे. बरेचसे बीएलओ हे शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, वसुली लिपीक, ग्रामपंचायत अधिकारी प्रवर्गातील असल्याने दररोज दुपारी दोन नंतर त्यांना पूर्णवेळ एसआयआरचे कामकाज करावे लागणार आहे. अनेक ठिकाणी शिक्षक हेच बीएलओ असल्याने ४ जुलै ते १० जुलै या कालावधीत शाळांची वेळ सकाळी करण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होता कामानये तसेच तासिकांमध्ये सुद्धा काही बदल करु नये, असेही निर्देश आहेत. शनिवारपासून स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी शाळा सकाळी साडेसात ते दुपारी एक या वेळेत भरणार आहेत. त्यामुळे आता सकाळी शाळेत विद्यादानाचे कार्य करून दुपारच्यावेळी एसआयआरची कामे अशी दुहेरी भुमिका शिक्षकांना वठवावी लागणार आहे.

निवडणुक आयोगाकडून राबविण्यात येत असलेल्या मोहिमेत अनेक शिक्षक बीएलओ आहेत. त्यामुळे कुठलेही शैक्षणिक नुकसान होवू न देता शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले आहे.


– **सतीश मुगल,** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद.

# जिल्हा परिषदेचा लक्ष्यपूर्ती कृती आराखडा

## सीईओंचे प्रलंबित कामे तातडीने करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

जिल्हा परिषदेच्या विविध योजना, विकासकामे आणि प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी विभागनिहाय लक्ष्यपूर्ती कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश आज दिलेत . जिल्हा परिषदेत झालेल्या आढावा बैठकीत आरोग्य, महिला व बालकल्याण, ग्रामीण पाणीपुरवठा, स्वच्छ भारत मिशन, जलजीवन मिशन, ग्रामपंचायत, बांधकाम, लघुसिंचन, कृषी, शिक्षण आणि समाजकल्याण विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विभागांमध्ये समन्वय वाढवून सेवा वितरण अधिक परिणामकारक करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. आरोग्य विभागाच्या सादरीकरणात प्राथमिक आरोग्यकेंद्रे, उपकेंद्रे, हेल्थ ॲण्ड वेलनेस सेंटरची स्थिती, रिक्त पदे, माता-बाल आरोग्य, संस्थात्मक प्रसूती तसेच मलेरिया व डेंगी प्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. महिला व बालकल्याण विभागाकडून अंगणवाडी इमारती, कुपोषित बालकांचे व्यवस्थापन, अमृत आहार योजना आणि मिशन-२८ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती सादर करण्यात आली. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने जलजीवन मिशन, पाणी गुणवत्तेच्या चाचण्या आणि पाणीटंचाई व्यवस्थापनाची माहिती दिली. ग्रामपंचायत विभागाकडून घरपट्टी-पाणीपट्टी वसुली, अतिक्रमण निर्मूलन, जनसुविधा कामे आणि पावसाळापूर्व तयारीचा आढावा घेण्यात आला. बांधकाम विभागाने विविध विकासकामांच्या प्रगतीचा अहवाल सादर केला, तर शिक्षण विभागाला शिक्षक उपलब्धता, शाळांतील सुविधा आणि सौरऊर्जा प्रकल्पांबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. आपले सरकार, पीजी पोर्टल, सीपीग्रामवरील तक्रारी, न्यायालयीन व चौकशी प्रकरणांचा नियमित आढावा घेऊन त्यांचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देशही सत्यम गांधी यांनी दिले.



### नागरिककेंद्री प्रशासनावर भर

विकासकामांची गुणवत्ता, योजनांच्या अंमलबजावणीतील परिणामकारकता आणि नागरिककेंद्री प्रशासनाला प्राधान्य देत विभागनिहाय कामकाजाचे नियमित मूल्यमापन सुरू ठेवण्यात येणार आहे. योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रलंबित बाबींचा वेळेत निपटारा आणि नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यावर जिल्हा परिषद प्रशासनाचा विशेष भर असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी सांगितले.

# पिककर्ज वितरणात बँका माघारल्या

## शेतकऱ्यांसाठी आडमुठे धोरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती–**

कर्जमाफी योजनेच्या पार्श्वभूमिवर यंदाच्या खरीप हंगामात पिक कर्ज वितरणाला फारशी गती आलेली नाही. राष्ट्रीय व खासगी बँकांनी पुन्हा एकदा नन्नाचा पाढा कायम ठेवल्याने ३० जून अखेरीस एकूण उद्दीष्टापैकी ५९ टक्के कर्ज वितरण झाले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेने मात्र आघाडी कायम ठेवली असून ८२ टक्के कर्जवितरण केले आहे. खरीप हंगामातील १६५० कोटी रूपयांच्या लक्ष्यांकापैकी ९७९.१७ कोटी रूपयांचे पिककर्ज वितरण झाले आहे. खरीप हंगामात पिक कर्ज वितरणास मंजूरी देण्यात आली असून १ एप्रिलपासून कर्जवितरणास प्रारंभ झाला आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचे प्रतिबिंब कर्जवितरणावर पडले आहे. जिल्हास्तरीय बँकींग समितीने प्रस्तावित केलेल्या १६५० कोटी रूपयांच्या लक्ष्यांकाला राज्यस्तरीय समितीने मंजूरी दिली असून तातडीने कर्जवितरण करण्याचे निर्देश बँकांना दिले आहेत. मात्र राष्ट्रीय व खासगी बँकांनी आडमुठे धोरण कायम ठेवले असून निर्देश पायदळी तुडवल्याचे दिसून येत आहे. १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत एकूण लक्ष्यांकांच्या तूलनेत ५९ टक्के कर्जवितरण झाले आहे. दहा पैकी पाच खासगी बँकांनी तर कर्ज वितरणच केलेले नाही. तर, राष्ट्रीय बँकांचीही प्रगती फारशी



समाधानकारक नाही. सेंट्रल बँक, स्टेट बँक, महाराष्ट्र बँक व इंडीयन ओवरसीज बँकांची आकडेवारी बरी असली तर उर्वरित बँकांनी मात्र शेतकऱ्यांना कर्जवितरणात फार रस घेतलेला नाही. जिल्हा मध्यवर्ती बँकेने यावर्षीही कर्ज वितरणात आघाडी कायम ठेवली आहे. या बँकेस ७८० कोटी रूपयांचे लक्ष्यांक असून आतापर्यंत ६३५.८३ कोटी रूपयांचे पिककर्ज वितरीत केले आहे. कर्जवितरणाची सरासरी ८२ टक्के आहे.

एकूण लक्ष्यांक : १६५० कोटी (१, ८८, ६०० सभासद)

प्रत्यक्ष कर्जवितरण : ९७९.१७ कोटी (६६, ७८२ सभासद)

सरासरी : ५९ टक्के

# विकसित भारत रोजगार अभियानाचा शुभारंभ

## गट विकास अधिकाऱ्यांच्या हस्ते अभियानाची सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मालखेड रेल्वे**

केंद्र व राज्य शासनाच्या विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान अंतर्गत ग्रामपंचायत मालखेड येथे अभियानाचा शुभारंभ गट विकास अधिकारी राणी माळवे यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वर्षातून किमान १२५ दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच शाश्वत विकास, कौशल्य विकास, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन, पायाभूत सुविधांची निर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यावर भर देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी गट विकास अधिकारी राणी



माळवे यांनी उपस्थित ग्रामस्थांना शासनाच्या विविध रोजगार व आजीविका योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून, या अभियानामुळे ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास ग्रामपंचायत प्रशासक लता पाटील, विस्तार अधिकारी रमेश मेश्राम, तांत्रिक अधिकारी मंगेश काकडे, ग्रामपंचायत अधिकारी साधना सोनोने, रोजगार सेवक गजानन बागडे, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांच्या सदस्यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# अंजनगावसुर्जीच्या वैभवात पडणार भर

## 'शिवसृष्टी' व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी आमदारांकडून निधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अंजनगाव सुर्जी**

शहरासह संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद आणि ऐतिहासिक ठरणाऱ्या शिवसृष्टी प्रकल्पावर शिक्कामोर्तब झाले आहे. गेल्या अनेक दशकांपासून शिवप्रेमी आणि नागरिकांचे स्वप्न असलेल्या भव्य 'शिवसृष्टी' व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या निर्मितीला अखेर हिरवा कंदील मिळाला आहे. आमदार गजानन लवटे यांनी या ऐतिहासिक कामासाठी ९० लाख ६० हजार रुपयांचा निधी प्रस्तावित करून मंजूर करून घेतला आहे. या नावीन्यपूर्ण कामाचे अधिकृत मंजुरी पत्र आमदार गजानन लवटे यांनी नगरसेवक सुयोग खाडे यांच्याकडे सुपूर्द केले. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जुन्या पंचायत समितीच्या जागेवर ही भव्य शिवसृष्टी उभारली जाणार असून, त्यामुळे अंजनगावसुर्जीच्या सांस्कृतिक वैभवात मोठी भर पडणार आहे. शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभा राहावा, यासाठी शहर-तालुक्यातील सामाजिक संघटना, शिवप्रेमी व नागरिकांनी वर्षानुवर्षे मोर्चे, निवेदने आणि आंदोलनांच्या माध्यमातून प्रयत्न केले. मात्र, जागेची अडचण, तांत्रिक परवानग्या व निधीच्या कमतरतेमुळे हा विषय लांबत गेला. आमदार लवटे यांनी मात्र निवडणुकीतील शब्द पाळत दीड वर्षातच भरीव निधी उपलब्ध करून दिल्याने शहरात आनंदाचे वातावरण आहे.

अंजनगाव सुर्जीमध्ये छत्रपती शिवरायांची आदर्श शिवसृष्टी उभी करणे हे माझे जुने स्वप्न आहे. आज स्वप्नपूर्तीची पहिली पायरी पार केली. या पवित्र कार्यासाठी भविष्यात निधीची कमतरता भासू देणार नाही. ही शिवसृष्टी कशी असावी, याचा निर्णय तालुक्यातील शिवप्रेमी, इतिहासकार, विविध संघटना व ज्येष्ठ नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून, त्यांच्या सूचना घेऊनच अत्यंत देखणी, प्रेक्षणीय आणि भव्य शिवसृष्टीची निर्मिती केली जाईल.




**–गजानन लवटे,** आमदार, दर्यापूर- अंजनगावसुर्जी.

# मतदारांची नावे डिलीट करणाऱ्यांवर एफआयआर; षडयंत्र करणाऱ्यांना सोडणार नाही – यशोमती ठाकूरांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

मतदार यादीतून मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप करत काँग्रेसने सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ज्यांनी मतदारांची नावे डिलीट करण्यासाठी अर्ज भरले, त्यांची माहिती निवडणूक आयोगाकडून मिळताच संबंधितांविरोधात एफआयआर दाखल केला जाईल, असा इशारा काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी अमरावतीत दिला.






याच पार्श्वभूमीवर काँग्रेस भवन येथे बूथ प्रमुखांना एसआयआर संदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आले.अमरावतीतील काँग्रेस भवन येथे आयोजित बूथ प्रमुखांच्या एसआयआर प्रशिक्षण कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना यशोमती ठाकूर यांनी मतदार यादीतील नावे वगळण्याच्या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

निवडणूक आयोगाकडून ज्यांनी मतदारांची नावे कमी करण्यासाठी अर्ज दाखल केले, त्यांची माहिती मिळाल्यानंतर त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करत एफआयआर दाखल करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.यापूर्वीही एसआयआर प्रक्रिया झाली होती. मात्र त्यासाठी जवळपास दोन वर्षांचा कालावधी देण्यात आला होता. आता मात्र अवघ्या दोन-तीन महिन्यांत ही प्रक्रिया राबवून मोठा घोळ घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. सत्ताधाऱ्यांकडून नियोजनबद्ध पद्धतीने मतदारांची नावे कमी करून निवडणुकीवर परिणाम करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

ठाकूर म्हणाल्या, प्रत्येक नागरिकाने मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, याची खात्री करणे ही स्वतःची जबाबदारी आहे. नाव नसल्यास तातडीने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून ते पुन्हा समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.तिवसा विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुकीनंतर तब्बल सात हजार मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा दावा करत, या नावांसाठी अर्ज कोणी भरले, ते कोणी मंजूर केले आणि ही प्रक्रिया कोणी राबवली, याची माहिती समोर आल्यानंतर संबंधितांना कोणतीही सूट दिली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील त्रुटी ओळखणे, नवीन मतदारांची नोंदणी करणे, हरकती आणि दुरुस्त्यांची प्रक्रिया प्रभावीपणे राबविणे यासाठी काँग्रेसच्या सर्व बूथ प्रमुखांना एसआयआरचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. मतदारांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी काँग्रेस प्रत्येक स्तरावर लढा देणार असल्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## राजापेठ पोलिसांची तत्पर कारवाई

# हरवलेले २५ लाखांचे सोन्याचे दागिने शोधून फिर्यादीच्या ताब्यात





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

पत्नीच्या उपचारासाठी हैदराबादला जाताना हरवलेले तब्बल २५ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने राजापेठ पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत शोधून काढत फिर्यादीच्या ताब्यात दिले. पोलिसांच्या या तत्पर आणि कौतुकास्पद कामगिरीमुळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.साईनगर येथील गजानन अंबर वर्धे (वय ५२) यांनी १ जुलै २०२६ रोजी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या पत्नी संगीता वर्धे यांच्यावर हैदराबाद येथील एआयजी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारासाठी मोठ्या खर्चाची आवश्यकता भासू शकते, या कारणाने त्यांनी पत्नीचे सुमारे १४० ते १५० ग्रॅम वजनाचे, अंदाजे २५ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लाल रंगाच्या बॅगेत ठेवून सोबत नेले होते.उपचारादरम्यान डॉक्टरांनी रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगून त्यांना अमरावतीला घेऊन जाण्याचा सल्ला दिला. त्यानुसार ॲम्ब्युलन्सने परतीचा प्रवास सुरू करण्यात आला. मात्र वाटेत आदिलाबाद येथे संगीता वर्धे यांचे निधन झाले. त्यानंतर अमरावतीत अंत्यसंस्काराची धावपळ सुरू असताना गाडीत ठेवलेली दागिन्यांची बॅग हरवल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी राजापेठ पोलिसांकडे धाव घेतली.प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी तत्काळ पोलीस आयुक्तांना माहिती देत विशेष पथक हैदराबादकडे रवाना केले. पथकातील पोलिसांनी हैदराबाद येथील एआयजी रुग्णालय, आदिलाबाद जिल्हा शासकीय रुग्णालय तसेच हैदराबाद-आदिलाबाद मार्गावरील जनता रेस्टॉरंट परिसरातील तब्बल ३० ते ४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे बारकाईने परीक्षण केले. दिवस-रात्र केलेल्या अथक शोधमोहीमेनंतर जनता रेस्टॉरंट परिसरातून लाल रंगाची बॅग शोधण्यात पोलिसांना यश आले.या बॅगेमध्ये अंदाजे २५ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने तसेच उपचारासंदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित अवस्थेत आढळून आली. पोलिसांनी पंचनामा करून सर्व मुद्देमाल फिर्यादी गजानन वर्धे यांच्या ताब्यात सुपूर्द केला.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि नितीन शिंदे तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईबद्दल राजापेठ पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जन्म-मृत्यू नोंदणीसाठी नवे नियम लागू; वेळीच करा नोंदणी, नाही तर.......

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती –** बोगस नोंदणीला आळा घालण्यासाठी जन्म-मृत्यूच्या नोंदीत मोठ बदल झाले. आता ३० दिवसांच्या नोंदणी न केल्यास जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्यांची मंजुरी घेणे अनिवार्य असेल. यामुळे वेळेत नोंदणी न करणाऱ्या नागरिकांना अतिरिक्त पडताळणी प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे.



जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. नव्या नियमांनुसार बाळाच्या जन्मानंतर ३० दिवसांच्या आत जन्माची नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे. त्यानंतरच्या विलंबित नोंदणीसाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची संमती घेणे आवश्यक असेल. नव्या नियमावलीत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना उपनिबंधकाचा दर्जा देण्यात आला आहे.

ग्रामपंचायतींकडून पाठविलेल्या विलंबित जन्म किंवा मृत्यू नोंदणीच्या प्रस्तावांची पडताळणी करून सात दिवसांच्या आत संमतिपत्र देणे त्यांच्यासाठी बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच विलंबित नोंदणी, नोंदीतील दुरुस्ती, नोंदणी न झालेल्या जन्म-मृत्यूची पडताळणी आणि दुहेरी किंवा चुकीच्या नोंदींची तपासणीही आता जिल्हा परिषदेमार्फत केली जाणार आहे. जन्म प्रमाणपत्र हे नागरिकांच्या कायदेशीर ओळखीचे मूलभूत दस्तऐवज मानले जाते.

शाळेत प्रवेश, आधार कार्ड, पासपोर्ट, मतदान ओळखपत्र, योजनांचा लाभ व वारसा हक्कासाठी जन्म प्रमाणपत्र आवश्यक असते. तर मृत्यू प्रमाणपत्राचा वापर वारसा हक्क, विमा दावा, बँक खाते बंद करणे, पेन्शन थांबविणे, मालमत्तेचे हस्तांतरण आणि इतर कायदेशीर प्रक्रियांसाठी केला जातो.राज्यात काही परकीय नागरिकांकडून विलंबाने जन्म नोंदणी करून घेतल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर बनावट आणि अपूर्ण नोंदींना आळा घालण्यासाठी ही नियमावली अधिक कडक करण्यात आली आहे.

# घटांगजवळ झाड कोसळल्याने धारणी-परतवाडा मार्ग ठप्प

## मुसळधार पावसामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका धारणी-परतवाडा मुख्य मार्गावरील वाहतुकीला बसला आहे. धारणी तालुक्यातील घटांग परिसरात शनिवारी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास एक मोठे झाड थेट रस्त्यावर कोसळल्याने धारणी-परतवाडा मार्ग पूर्णपणे बंद झाला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून प्रवाशांना अनेक तास अडकून राहावे लागले.गेल्या काही दिवसांपासून मेळघाट परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे जमिनीची पकड सैल झाल्याने हे मोठे झाड उन्मळून रस्त्यावर कोसळल्याचे प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहेत. झाड रस्त्याच्या मध्यभागी पडल्याने मोठी वाहने, एसटी बस, मालवाहू ट्रक तसेच खासगी वाहनांची



वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. काही वाहनचालकांनी पर्यायी मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला, मात्र परिसरातील भौगोलिक परिस्थितीमुळे त्यांनाही अडचणींचा सामना करावा लागला.घटनेची माहिती मिळताच संबंधित प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. झाड हटविण्यासाठी यंत्रसामग्रीच्या सहाय्याने युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले आहे. पावसाचा जोर कायम असल्याने आणि झाडाचा आकार मोठा असल्यामुळे ते हटविण्यास काहीसा विलंब होत असल्याची माहिती प्रशासनाने दिली.या घटनेमुळे धारणी, चिखलदरा आणि मेळघाट परिसराकडे जाणाऱ्या तसेच परतवाड्याकडे येणाऱ्या वाहनांची मोठी कोंडी झाली. अनेक प्रवाशांना प्रवासात विलंब सहन करावा लागला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा वाहनांचे मोठे नुकसान झाल्याची माहिती समोर आलेली नाही.दरम्यान, हवामान विभागाने विदर्भात पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्याने डोंगराळ आणि घाटमाथ्यावरील भागात प्रवास करताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, तसेच आवश्यक असल्यासच प्रवास करावा आणि पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन केले आहे.झाड हटविण्याचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरु आहे.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हायटेक वस्त्र धुलाई केंद्राचे उद्घाटन

## रुग्णसेवेला आधुनिक सुविधांची जोड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती :**

शहरातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज भारती वॉशिंग कंपनी – हायटेक वस्त्र धुलाई केंद्र सुरू करण्यात येत असून, या केंद्राच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे रुग्णालयातील वस्त्रांची स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि गुणवत्तापूर्ण धुलाई अधिक प्रभावीपणे होणार असल्याने रुग्णसेवेच्या दर्जात महत्त्वाची भर पडणार आहे.या उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन महाराष्ट्र शासन आश्वासन समितीचे अध्यक्ष रविभाऊ राणा यांच्या हस्ते करण्यात आले असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख होते माजी शिक्षण



सभापती आशीष कुमार गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होतीयाशिवाय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे आरएमओ महादेव धोपरे, अशोक धोटे, अशोक बुंदेले, राधेश्याम चंदेले, संतोष किल्लेकर आणि संजय बुंदेले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होतेया हायटेक वस्त्र धुलाई केंद्रामध्ये आधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने रुग्णालयातील बेडशीट, लिनेन, डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे गणवेश तसेच इतर आवश्यक वस्त्रांची स्वच्छ, सुरक्षित आणि निर्जंतुकीकरणयुक्त धुलाई केली जाणार आहे. संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यास तसेच स्वच्छतेचे उच्च दर्जाचे निकष पाळण्यास या केंद्राची मोठी मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.या उपक्रमाचे आयोजन धुराटकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. आयोजकांमध्ये प्रवीण हंसराज धुराटकर, भारती धुराटकर, आकांक्षा धुराटकर, आकाश धुराटकर, पायल धुराटकर आणि मास्टर आदिक्ष धुराटकर यांचा समावेश आहे.या उद्घाटन सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, हितचिंतक, मित्रपरिवार तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. आधुनिक आरोग्यसेवे साठी आवश्यक स्वच्छता व्यवस्थेला बळकटी देणारा हा उपक्रम अमरावतीतील आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# ‘हुतूत’ बियाण्याचा फटका? मोर्शीत सोयाबीन उगवलंच नाही; संतप्त शेतकरी आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मोर्शी** अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यासह परिसरात बुस्टर कंपनीच्या ’हुतूत’ सोयाबीन बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. पेरणीनंतर दहा दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही अनेक शेतांमध्ये सोयाबीनची उगवणच झाली नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पावसाची परिस्थिती अनुकूल असतानाही बियाणे उगवले



नसल्यामुळे आता दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. बियाणे, मशागत, मजुरी आणि खतांचा अतिरिक्त खर्च करावा लागणार असल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा शेतकरी करत आहेत. त्यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, संबंधित बियाणे कंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून बियाण्यांची गुणवत्ता तपासावी, दोषी आढळल्यास कंपनीविरुद्ध गुन्हे दाखल करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.जर शासन आणि कृषी विभागाने त्वरित दखल घेतली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकरी संघटनांनी दिला आहे. या प्रकरणामुळे जिल्ह्यातील बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाची भूमिका काय राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.